**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष नारायण कुंजीर
उपशिक्षक, लोणावळा नगरपालिका शिक्षण मंडळ,
प्राथमिक शाळा, वळवण, ता.मावळ, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
लोणावळा नगरपालिका शिक्षण मंडळ, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.९.२००७ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.सुभाष नारायण कुंजीर
उपशिक्षक, लोणावळा नगरपालिका शिक्षण मंडळ,
प्राथमिक शाळा, वळवण, ता.मावळ, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे
श्री.एस.एन.पांढरे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
लोणावळा नगरपालिका शिक्षण मंडळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.विश्वास भिकू तापकीर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.४.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>दि.५.३.२००२ च्या शासनाच्या सुधारित अपंग पदोन्नती आदेशानुसार अपंगांची ३ टक्के आरक्षणानुसार नगरपालिका शिक्षण मंडळ मुख्याध्यापक पदोन्नती भरण्याची कार्यवाही केली आहे काय? त्यासंबंधित कागदपत्रे. |

## विवेचन

मुख्याध्यापक पदावरील नियुक्ती व सेवा बाबी या विषयाची माहिती अपीलकर्ता श्री.सुभाष नारायण कुंजीर , उपशिक्षक, लोणावळा नगरपालिका शिक्षण मंडळ, प्राथमिक शाळा, वळवण, ता.मावळ, जि.पुणे यांनी मागितली होती. मिळालेली माहिती अपुरी व चुकीची असल्याच्या कारणावरुन श्री.कुंजीर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे अपील केले. श्री.कुंजीर यांनी संपूर्ण माहिती देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले तरीही पूर्ण माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.कुंजीर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.कुंजीर यांची मुख्य मागणी मुख्याध्यापक पदोन्नतीच्या संदर्भातील आहे. याबाबत विविध पातळ्यांवर ते पत्रव्यवहार / अर्ज करीत आले आहेत. शासन निर्णयाच्या प्रतीसारख्या माहितीत न देण्यासारखे काही नव्हते, परंतु एखादी प्रत द्यावयाची राहिली, तिची पूर्तता केली जाईल, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, लोणावळा नगरपालिका शिक्षण मंडळ श्री.विश्वास भिकू तापकीर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ८.१.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे विभाग यांच्यासमोर माहितीचा अधिकार नियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.सुभाष नारायण कुंजीर
उपशिक्षक
शिक्षण मंडळ प्राथमिक शाळा, वळवण,
लोणावळा, जि. पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
डॉ. आंबेडकर मार्ग,लाल देवळा शेजारी,
पुणे १ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
लोणावळा नगर शिक्षण मंडळ,
ता.मावळ, जिल्हा पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७२,४७७ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/२/२००६<br>दि.२०/२/२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/३/२००६<br>दि. २९/३/२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.५.४.२००६, दि.५.४.२००६ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीबाबत (श्री. कुंजीर यांच्या)दि.१५/१२/२००३ रोजीच्या अर्जावरील कार्यवाही |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुभाष नारायण कुंजीर यांनी त्यांच्या मुख्याध्यापक या पदावरील पदोन्नतीच्या अनुषंगाने कागदपत्रांची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, लोणावळा, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, विभाग, पुणे यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री.कुंजीर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलाच्या अनुषंगाने दि.१.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती स्वत:च्या मुख्याध्यापक म्हणून पदोन्नतीसंबंधात होती. अपीलकर्त्यास मुख्याध्यापक या पदावर पदोन्नती मिळाली असल्याने त्यांनी माहिती अधिकाराखालील आपली अपिले निकाली काढण्याबाबत दि. २८.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगाला विनंती केली आहे सबब आयोग पुढील प्रमाणे आदेश देत आहे :-

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. २२/१/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

सौ. अर्चना सुनिल अगरवाल
स.क्र.१०१, नेहरुनगर, पिंपरी, पुणे-४११ ०१८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (मर्यादित),
भोसरी विभाग,पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (मर्यादित),
भोसरी विभाग,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. अर्चना सुनिल अगरवाल
स.क्र.१०१, नेहरुनगर, पिंपरी, पुणे-४११ ०१८

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (मर्यादित), भोसरी विभाग,पुणे
श्री. डी. के. माने

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (मर्यादित), भोसरी विभाग,पुणे
श्री. बी. वाय. गवई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २०.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १०.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ४.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ३.५.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (मर्यादित), भोसरी विभागीय कार्यालयामार्फत सुरक्षा ठेका, साफ सफाई सेवा, वीजबिल वाटप, वीजबिल मीटर रीडिंग घेणे, वीज बिल भरणाचे अधिकार केंद्र, वीज पुरवठा खंडित करणे व जोडणे याचे कत्रांट; ठेका देण्याचे नियम, अटी, शर्ती, पात्रता, खाजगी वाहन सेवा यासह तपशीलवार माहिती

## विवेचन

अपीलकर्त्या सौ. अर्चना सुनील अगरवाल यांनी प्रामुख्याने वीज चोरीच्या अनुषंगाने वर नमूद केलेल्या विषयाची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., विभागीय कार्यालय, भोसरी यांनी सौ. अगरवाल यांचा अर्ज उप विभाग, भोसरी क्र.२ यांच्याकडे पाठविला. तसेच अर्जातील चार मुद्यांसदर्भात माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी, विभाग भोसरी यांच्याशी संपर्क साधावा, असे सौ.अगरवाल यांना कळविले. दि. ८.३.२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी सौ. अगरवाल यांना माहितीसाठी शुल्क भरण्याचे कळविले. परंतु दि. ५.४.२००६ पर्यंत त्यांनी शुल्क भरले नव्हते. दि. २.५.२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी सौ. अगरवाल यांना शुल्क भरण्याबाबत पुन्हा पत्र पाठविले. सौ. अगरवाल यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, भोसरी विभाग, पुणे यांनी फेटाळले. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम २ (क) (३)

'अन्वये भारतातील सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार असेल, सदर अर्ज अधिनियमाच्या तरतुदीत व्याख्येत नसल्यामुळे, आपला अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे,' असे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, भोसरी विभाग, पुणे श्री. डी.के.माने यांनी कळविले. दरम्यानच्या काळात दि. २६.४.२००६ रोजी सौ. अगरवाल यांनी आवश्यक ते शुल्क रु. १७५/- भरले असल्याची पावती जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली होती. परंतु श्री. माने यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास नकार दिला व सौ. अगरवाल यांनी भरलेले शुल्क परत केले.

सौ. अगरवाल यांनी अध्यक्षा 'नारी शक्ती महिला विकास संस्था' असा उल्लेख करुन संस्थेच्या वतीने माहिती मागितली होती, त्यामुळे 'संस्था' नागरिक या व्याख्येत बसत नसल्यामुळे आपण असा निर्णय दिला, असे श्री. माने यांनी राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

शुल्क परत केले. परंतु माहिती दिली नाही, विलंब झाल्यामुळे नि:शुल्क माहिती द्यावयास हवी होती, असे प्रतिपादन सौ. अर्चना अगरवाल यांचे प्रतिनिधी श्री. सुनिल अगरवाल यांनी केले. संस्थेतर्फे माहिती मागितली असल्यामुळे ही माहिती व्यक्तीसाठी नाही, अशी समज होऊन आपण अपील फेटाळले होते, ही अन्वयार्थ लावण्यातील चूक आहे, असे निवेदन श्री. माने यांनी केले. सौ. अगरवाल यांनी मागितलेली माहिती तयार असून ती त्वरित देता येईल, असे जन माहिती अधिकारी तथा तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., विभागीय कार्यालय, भोसरी श्री. बी. वाय. गवई व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, भोसरी विभाग, पुणे श्री. डी.के. माने यांनी नमूद केले.

सौ. अगरवाल यांनी वेळेत शुल्क न भरल्यामुळे माहिती तयार असूनही त्यांना देता आली नाही तसेच याच काळात आपल्याकडे रचना उपविभागाचा अतिरिक्त कार्यभार होता, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, भोसरी श्री. एम.एस. नान्हे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

संस्थेला माहिती मागता येणार नाही, हा अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. माने यांनी लावलेला अन्वयार्थ योग्य नाही. संस्थेच्या वतीने प्रतिनिधी म्हणून सौ. अगरवाल यांनी

माहिती मागितलेली आहे, मात्र सौ. अगरवाल यांनी विहित वेळेत माहितीसाठीचे शुल्क भरलेले नाही. ते त्यांनी भरण्यास हवे होते.

संबंधित माहिती सौ. अगरवाल यांना पाच दिवसात व निःशुल्क द्यावी असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता, त्यानुसार सौ. अगरवाल यांना काही माहिती सुनावणीच्या दिवशीच दिली व ऊर्वरित माहिती दि. १२.९.२००७ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली, अशी पोहच सौ. अगरवाल यांनी दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ८.१.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे घविशेष अपील निर्गत कार्यक्रम दिनांक २२-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे - नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५०६/ सांगली | श्री. अनिल एस. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस, जिल्हा सांगली | माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर | अपिलीय प्राधिकारी, विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर | सांगली जिल्ह्यातील नेट-सेट ग्रस्त शिक्षकांच्या ५ व्या वेतन आयोगातील थकित वेतवाढीच्या फरकाबाबत. | अपीलकर्त्याने थकित रक्कम मिळण्याची मागणी प्रपत्रात नमूद केली आहे. ही बाब कार्यवाहीशी निगडीत असून यांचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत समावेश होत नाही. |
| २. | ६११/ सांगली | सौ. मनिषा मच्छिंद्र गावडे मु.पो.शिगांव, लक्ष्मीनगर, ता.वाळवा, जिल्हा सांगली | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत शिगांव, ता.वाळवा, जिल्हा सांगली | गटविकास अधिकार, पंचायत समिती, इस्लामपूर, ता.वाळवा, जिल्हा सांगली | श्री. भगवान आबा गावडे यांच्या नळ कनेक्शनबाबत एकूण ०४ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.१४/१०/२००८ रोजी आयोगास कळविले आहे. |
| ३ | ५८७/ सांगली | श्री.विनायक दिनकर भोसले ७९९८/२, छशिवरंजनीछ स्टेशन रोड, मिरज, जिल्हा सांगली | नगर भूमापन अधिकारी कार्यालय, मिरज, जिल्हा सांगली | अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, जिल्हा सांगली | नगर भूमापन नकाशा व मिरज नगर रचना योजना क्र.१ च्या नकाशातील तफावतीबाबत | अपीलकर्त्याने मागितलेली माहिती नसून कारवाईची मागणी आहे., बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५८८/ सांगली | श्री.धायरेश्वर रामेश्वर चेंडके रेव्हेन्यू कॉलनी, प्लॉट नं.९, मार्केट यार्ड जवळ, सांगली | उपविभागीय अधिकारी, मिरज विभाग, मिरज, जिल्हा सांगली | अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली . | तलाठी या पदासाठी घेण्यात आलेल्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकेची मागणी | जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी सदर पदाच्या भरतीची प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने अपीलकर्त्यास माहिती देण्यात येईल, असे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४९७/ सांगली | श्री.रामचंद्र विष्णू साळुंखे, तलाठी कॉलनी, इस्लामपूर, जिल्हा सांगली | शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | ज्यू कालेज, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, सांगली येथे शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी दि.१५.११.२००६ रोजी केलेल्या तपासणी अहवालाची प्रत | माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने दि. २५.११.२००८ आयोगास कळविले आहे. |
| ६०६/ सांगली | श्री.मधुकर शंकर कांबळे मु.पो.शेणगाव, ता.जत, जिल्हा सांगली | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जत, ता.जत, जिल्हा सांगली | तहसीलदार, तहसील कार्यालय, जत, ता.जत, जिल्हा सांगली | कोतवाल भरती, वाळू व जमीन महसूल संहिता १९६६ इ. बाबत एकूण २२ मुद्दयांची माहिती. | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगात कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

(१) वरील सर्व अपिले क्र. क्र. १ ते ६ (क्र.५०६,६११,५८७,५८८,४९७ व ६०६) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपील क्र.५८८ बाबतच्या प्रपत्रात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज विभाग, मिरज यांनी उपलब्ध करुन द्यावीव अनुपालन अहवाल त्यानंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास ते नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५-०१-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नितीन गोविंदराव यंदे
बंगला क्र.१, पूर्ती हौसिंग सोसायटी,
धनकवडी, पुणे-४११ ०४३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
अध्यक्ष/कार्यवाह/विश्वस्त
सोमवंशी आर्य क्षत्रिय समाज ट्रस्ट,
६४१, नारायण पेठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ६.९.२००७ + ७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नितीन गोविंदराव यंदे, बंगला क्र.१, पूर्ती हौसिंग सोसायटी, धनकवडी, पुणे-४११ ०४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
श्री. अे. एच. शिंगणे

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष/कार्यवाह/विश्वस्त
सोमवंशी आर्य क्षत्रिय समाज ट्रस्ट, ६४१, नारायण पेठ, पुणे
श्री. मोहन आहेर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ७.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | २.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १७.१०.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

ट्रस्टच्या वार्षिक अंदाजपत्रकात वधू - वर मेळाव्यासाठी केलेली तरतूद, तसेच आमसभेत; वार्षिक सर्वसाधारण सभेत अंदाजपत्रक आणि वधू - वर मेळाव्यासाठी केलेल्या खर्चाच्या, रकमेच्या, तरतुदीच्या आमसभेच्या मंजूर ठरावाची प्रत, वधू - वर परिचय मेळाव्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या व्यक्तींच्या नियुक्त्या, समितीची कामे, व्यक्तींची नावे व पत्ते, व्हिडिओ शूटिंग, फोटो यासाठी मागवलेले कोटेशन, निविदांच्या प्रती, छपाई करणाऱ्या छपाईदाराचे व्यवसायाचा परवाना, व मेळाव्याच्या कामासाठी नेमण्यात आलेल्या तात्पुरत्या स्वरुपाचा सेवकवर्ग व त्यांचा पगार, भत्ते इ. माहिती, वधू - वर मेळाव्यासाठी करण्यात आलेला खर्च, स्मरणिकेसाठी आलेल्या देणग्या व स्मरणिका देण्यात आलेल्या व्यक्तींची नावे व पत्ते इत्यादी

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नितीन गोविंदराव यंदे यांनी सोमवंशी आर्य क्षत्रिय समाज ट्रस्टकडे ट्रस्टच्या वधू-वर मेळाव्यासंबंधीची माहिती मागितली होती. विश्वस्तांनी माहिती न दिल्यामुळे श्री. यंदे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपील मान्य केले व श्री. यंदे यांना दोन माहिन्यात माहिती देण्याचे आदेश विश्वस्तांना दिले. परंतु त्यानंतरही विश्वस्तांनी माहिती दिली नाही, म्हणून श्री. यंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. यंदे यांना उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली आहे, असे विश्वस्तांच्या वतीने श्री. मोहन आहेर, सहकार्यवाह सोमवंशी आर्य क्षत्रिय समाज ट्रस्ट यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. मात्र आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री. यंदे यांनी केले.

श्री. यंदे हे संस्थेचे माजी विश्वस्त आहेत. संस्थेमध्ये दोन गट असून सातत्याने परस्पर विरोधी अर्ज उभय बाजू करीत असतात. या स्वरुपाचे अनेक अर्ज धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे दाखल आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे श्री. अे. एच. शिंगणे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. श्री. यंदे यांना आवश्यक ती माहिती पुन:पुन्हा दिली आहे, असे श्री. मोहन आहेर यांनी लेखी व तोंडी नमूद केले. ट्रस्टचा कारभार योग्य पध्दतीने चाललेला नाही, म्हणून माहिती उघड होणे आवश्यक आहे, असे श्री. यंदे यांनी त्यांच्या निवेदनात म्हटले आहे.

श्री. शिंगणे यांनी नमूद केल्याप्रमाणे अंतर्गत वादातील हा एक भाग आहे, असे माहिती मागण्याचे - देण्याचे/नाकारण्याचे स्वरुप आहे. आपल्याला कोणती माहिती मिळालेली नाही, हे श्री. यंदे यांनी नेमकेपणे नमूद केल्यास व या आधी ती दिलेली नसल्यास त्वरित दिली जाईल, असे ट्रस्टच्या विश्वस्तांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. द्यावयाची राहिलेल्या माहितीचा नेमका तपशील श्री. यंदे यांनी विश्वस्तांना सादर करावा व त्यानुसार विश्वस्तांनी द्यावयाची राहिलेली माहिती श्री. यंदे यांना नि:शुल्क पुरवावी.

**पुणे**
**दि. ७.१.२००८**



**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती ताराबाई सिध्देश्वर संगमनेरकर
१०१, महात्मा फुले पेठ,
श्रमदान मारुती शेजारी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग १, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. १ पुणे
तहसीलदार कचेरी आवार, पुणे-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७५ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १९.६.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २७.७.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | २९.८.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ५.१०.२००६ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>दि. २९.६.१९९५ रोजी नोंदविण्यात आलेल्या अनुक्रमांक क्र. ४५८३/९५ या दस्तऐवजाची मूळ अथवा प्रमाणित व इंडेक्स । च्या प्रती | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती ताराबाई सिध्देश्वर संगमनेरकर यांनी सह दुय्यम निबंधक, हवेली, क्र.१ कार्यालयात दि. २१.६.१९९५ रोजी नोंदणी केलेला दस्त क्र. ४५८३/९५ मिळण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्रीमती संगमनेरकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलाच्या अनुषंगाने आयोगाने दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. आपल्याला मूळ दस्त मिळाला असून या अपिलाबाबत आपली कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याने आपले अपील निकाली काढण्याबाबत श्रीमती संगमनेरकर यांनी सह दुय्यम निबंधक, हवेली १, पुणे यांना दि. ५.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सह दुय्यम निबंधक, हवेली १, पुणे यांनी दि. २९.१२.२००७ रोजीच्या पत्रासोबत श्रीमती संगमनेरकर यांचे तसे निवेदन आयोगाला पाठविले असून सदर अपील निकाली काढण्याबाबत विनंती केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ११.१.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अंगद नरहरी भोसले
द्वारा सदलापुरे, सर्व्हे क्र. ५३/५८,
साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-१४

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
शिक्षण विभाग, लातूर
जिल्हा परिषद, लातूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ६७१ / पुणे | २६.१२.२००६ | -- | १७.२.२००७ | १.३.२००७ |
| ६७२ / पुणे | २६.१२.२००६ | -- | १७.२.२००७ | १.३.२००७ |

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

लातूर जिल्ह्यातील १. गदगे अप्पा मानकरी विद्यालय, गुरनाळ, ता. देवणी २. शिवाजीराव शेडगे विद्यालय, भोपणी, ता. देवणी ३. मौलाना आझाद विद्यालय, देवणी ४. संत मोतीराम महाराज विद्यालय, किनगाव, ता. अहमदपूर ५. अल फारुख उर्दु हायस्कूल, नळेगांव, ता. चाकूर, जि. लातूर या विद्यालय / माध्यमिक शाळांच्या मूल्यांकनाची माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अंगद नरहरीराव भोसले यांनी लातूर येथील वर नमूद केलेल्या पाच विद्यालये / माध्यमिक शाळांसंबंधीची माहिती जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. या अपिलांबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याने अपिले निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. २९.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**पुणे**
**दि. ११.१.२००८**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १६-१२-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ७२६/ सांगली | श्री.बाबुराव हरिभाऊ जाधव श्री हरि निवास, १ ली गल्ली, रामनगर (पश्चिम), कोल्हापूर रोड, सांगली | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , सांगली | सन २००३ नंतर श्री. बाबुराव हरिभाऊ जाधव यांना ५ व्या वेतन आयोग देण्यासंबंधात स्टॅंडिंग कमिटीच्या झालेल्या बैठकीबाबत माहिती. | जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २. | ७२९/ सांगली | पांडुरंग नामदेव शिंदे मु.पो.वाळेखिंड, ता.जत, जिल्हा सांगली | कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | दि.१/४/२००६ ते २६/६/२००८ या कालावधीत मौजे वाळेखिंड येथील पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने एकूण १६ मुद्दयांची माहिती. | जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी दि.३१/१२/२००८ अखेर माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ७०९/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | प्रकल्प अधिकारी, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | सन २००६-२००७ या कालावधीतील सांगली महानगरपालिकेतील संजय नगर, वॉर्ड क्र.१२ मधील खण बुजविण्याबाबत एकूण ०४ मुद्दयांची माहिती. | जन माहिती अधिकारी/अपिलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ७३५/ सांगली | डॉ.मोहन यशवंत खिरे रानडे चाळ, स्टेशन रोड, मिरज, जिल्हा सांगली | जन माहिती अधिकारी , वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, विश्रामबाग, सांगली | अपिलीय प्राधिकारी, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, विश्रामबाग, सांगली | सन १९८४ साली झालेल्या निवडीनुसार ५ पैकी २ वेतनवाढी नाकारण्याची कारणे व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य ,मुंबई यांच्या बरोबर केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती. | जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी तीन महिन्यांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र एवढा कालावधी मागणे योग्य नाही. एक महिन्यात माहिती दिली गेली पाहिजे. |
| ५ | ७४९/ सांगली | श्री.संपतराव बाळासो पाटील मु.पो.नागराळे, ता.पलूस, जिल्हा सांगली | सचिव, श्री.विष्णू भैरव जलसिंचन सहकारी संस्था, नागराळे, ता.पलूस, जिल्हा सांगली | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पलूस, जिल्हा सांगली | सन १९८३ ते सन २००७ या कालावधीत संस्थेचा भांडवली खर्च, कार्यालयीन खर्च, सभासद संस्था, निवडणूक व सभा इत्यादीबाबत एकूण ६ मुद्दयांची माहिती. | जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती १५ दिवसांच्या आंत देण्याचे प्रपत्रात [illegible]द केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

(१) वरील सर्व अपिले ०५ (क्र.७२६,५२९,७०९, ७३५ व ७४९) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले [illegible] तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवडयात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १४-०१-२००८